कावळ्याला खूप तहान लागली होती. पाणी कुठेच दिसत नव्हते. एका भांड्याच्या आत तळाशी थोडेसेच पाणी होते. कावळ्याची चोच पाण्या पर्यंत पोहचेना. आता काय करावे? कावळा हुषार होता. त्याने आजुबाजूला पाहिले. त्याला जमिनीवर खूप दगडगोटे दिसले. कावळ्याने एका पाठोपाठ छोटे दगड गोटे त्या भांड्यात टाकायला सुरूवात केली. काही वेळाने त्याच्या लक्षात आले की हळुहळु पाणी वरती येत आहे. ते पाहून कावळ्याला फार आनंद झाला. पाणी भांड्याच्या काठापर्यंत वर आले. कावळ्याने चोचीने पाणी पिऊन टाकले. त्याची तहान भागली.

प्रश्न–

१. कावळ्याला पाणी कुठे दिसले?

२. कावळ्याने पाणी कसे वरती आणले?

३. कावळ्याने भांड्यात माती टाकली असती तर काय झाले असते?

४. कावळ्याने चोचीत मोठ्ठे दगड का नाही घेतले?

५. लांब चोचीचा दुसरा पक्षी कोणता ते सांगा.

एका गावाच्या बाहेर मोठा ओढा वाहत होता. ओढ्याला भरपूर पाणी होते. एका किनाऱ्या वरून दुसऱ्या किनाऱ्यावर जायला पूल नव्हता. एके ठिकाणी मोठ्या झाडाचा ओंडका दोन्ही किनाऱ्यावर आडवा तुटून पडलेला होता. एकदा काय झाले माहित आहे? दोन बकऱ्या ओढ्याच्या दोन्ही बाजूंनी त्या ओंडक्यावर ओढा ओलांडायला आल्या. ओढ्याच्या मध्यभागी आल्या. दोघींची तोंडे एकमेका समोर. आता काय करायचे? मागे तर जाता येत नव्हते. उलटे चालत गेले तर पाय घसरायचा आणि पाण्यात पडायची भिती. त्यांना एक युक्ती सुचली. एक बकरी ओंडक्यावर खाली बसली व दुसरी बकरी तिच्या पाठीवरून हळूच दुसरीकडे गेली.

प्रश्न –

१) ओढा म्हणजे काय? तो कुठे होता?

२) ओढा ओलांडता येत नव्हता. का?

३) ओढ्याच्या दोन किनाऱ्यावर काय पडले होते?

४) दोन बकऱ्यांनी ओढा कसा ओलांडला?

५) तुम्ही दोन मित्र असे भेटले असता तर काय केले असते?

आदित्यला काकाचे नविन घर खूप आवडले. घराला काचेच्या मोठ्या खिडक्या होत्या. त्याचे काका व काकू इमारतीच्या सोळाव्या मजल्यावर राहात होते. खिडकीतून समोरची बाग, रस्ता व माणसे दिसायची. तिथून खाली पाहिल की सगळेच छोटे छोटे दिसायचे. छोटे रस्ते, छोट्या गाड्या आणि छोटी छोटी माणसे. काकू म्हणाली " इथून विमानतळ जवळच आहे. संध्याकाळ झाली की खूप विमाने दिसतील." आदित्य संध्याकाळी खिडकी जवळ बसला. त्याने खूप विमाने पाहिली. काही खाली उतरणारी तर काही उंच उडणारी. एक विमान काकाच्या घराकडे वळून येतांना दिसले. विमानाच्या छोट्या छोट्या खिडक्या, मोठे पंख, विमानाचे नाव सगळ काही छान दिसत होते. त्या विमानाचे दिवे चमकत होते. आदित्यने कागद घेतला व त्यावर विमान काढले. उद्या शाळेतल्या मुलांना विमाने कशी दिसली ते सांगायचे.

प्रश्न–

१) आदित्यचे काका काकू कुठे राहात होते?

२) खिडकीतून कसे दिसत होते ते सांगा.

३) काकू काय म्हणाली?

४) विमान कसे दिसले?

५) विमानतळावर आणखी काय काय असते?

# **हावरट मांजर**

एक होती आजी. तिची एक गाय होती. ती रोज गायीचे दूध काढून दुधाचे दही बनवत असे. दही घुसळून ताक करत असे. ताकावरचे लोणी काढून लोणी बरणीत झाकून ठेवत असे.
एका मांजराने आजीला लोणी काढताना बघितले. लोणी पाहून मांजराला हाव सुटली. आजी काम आटपून बाहेर गेली. तसे मांजर हळूच घरात शिरले.

लोणी खायला मांजराने बरणीत तोंड घातले आणि मांजराचे तोंड बरणीत अडकून बसले. मांजराने खूप धडपड केली पण काही उपयोग झाला नाही. इतके होते न होते तोच पाठीमागून आजीने मांजराला फटके मारले. कसे बसे मांजराने बरणीतून तोंड बाहेर काढले आणि धूम पळत सुटले.

प्रश्न-

1. आजी रोज काय करीत असे?
2. मांजराने काय बघितले?
3. लोणी खाण्यासाठी मांजराने काय केले?
4. मांजराचे तोंड बरणीत कसे अडकले?
5. आजी आल्यावर काय झाले?

# कोंबडीचे अंडे

एका गावात दामू नावाचा एक माणूस राहात होता. तो देवाचा भक्त होता. त्याच्या भक्तीवर खूष होऊन एक दिवस देवाने त्याला एक कोंबडी बक्षीस दिली. ही कोंबडी दररोज एक सोन्याचे अंडे द्यायची. दामू ते अंडे सोनाराला विकून भरपूर पैसा मिळवायचा. असे बरेच दिवस चालले होते.

एक दिवस दामूच्या मनात विचार आला. रोज अंडे मिळणार आणि ते विकून हळूहळू पैसे मिळणार. त्यापेक्षा एकदम पैसे मिळाले तर लगेच एखादा बंगला खरेदी करता येईल. शेतीवाडी घेता येईल. घरात नोकरचाकर ठेवता येतील आणि एक श्रीमंत म्हणून शहरात फिरता येईल. घरात पत्नीला, मुलांना दागिने आणि छान कपडे घेता येतील. घरात बाहेर सर्व ठिकाणी आपला सन्मान होईल. ही कोंबडी रोज एक सोन्याचे अंडे देते. म्हणजे हिच्या पोटात असंख्य सोन्याची अंडी असतील. हिला कापून ती सर्व अंडी एकाच वेळी मिळवता येतील.

एक दिवस त्याने त्या कोंबडीचे पोट चिरले. बिचारी कोंबडी मेली. तिच्या पोटात दामूला एकही अंडे सापडले नाही. अति लोभाने दररोज मिळणारे सोन्याचे अंडे त्याने गमावले आणि कोंबडीही गमावली. अति लोभाचा फळ नेहमी वाईट असते.

**प्रश्न-**

1. दामूला देवाने काय आणि का दिले?
2. कोंबडी रोज काय द्यायची?
3. एकदम खूप पैसे मिळाले तर काय करता येईल असे दामूला वाटले?
4. दामूच्या मनात काय विचार आला?
5. दामूने कोंबडीचे पोट चिरल्यावर काय झाले?

# लांडगा आला रे आला

एका गावात दीपक नावाचा एक धनगर होता. दीपक रोज आपल्या मेंढया घेऊन गावाबाहेर चरायला घेऊन जात असे. संध्याकाळ झाली की परत आणत असे. त्याचा हा रोजचा दिनक्रम होता. तो जेथे मेंढ्या चरायला घेऊन जाई तेथे शेत होती. अनेक गावकरी तेथे दिवसभर काम करत असत.

एकदा तो असाच मेंढ्यांना घेऊन चरायला गेला होता. दुपार झाली. त्याने जेवण केले. पण नंतर त्याला फार कंटाळा आला. काहीतरी गंमत करायची असे त्याने ठरवले. तो जोरात ओरडला, “लांडगा आला रे आला.”

लोकांना खरेच वाटले. ते शेतातली आपली कामे सोडून काठ्या घेऊन धावत त्याच्याजवळ आले. त्याला विचारू लागले, “कुठे आला लांडगा”. तेव्हा तो मोठ्याने हसू लागला व म्हणाला, “कशी गंमत केली.”

शेतकरी संतापले. पण करतात काय तसेच निघून गेले. दीपकला मात्र यात गंमत वाटली. दुसऱ्या दिवशी त्याने पुन्हा हाच उद्योग केला. शेतकऱ्यांना उगाचच एक हेलपाटा पडला. पुन्हा दीपक कसे फसवले म्हणून हसू लागला. शेतकरी संतापून निघून गेले.

तिसऱ्या दिवशी तो पुन्हा मेंढ्या चरायला घेऊन आला. दुपार झाली आणि तो जेवायला बसला. पण त्या दिवशी खरेच एक लांडगा तेथे आला आणि त्याने एका मेंढीवर ताव मारला.

दीपक जोरजोरात ओरडू लागला, "लांडगा आला रे आला." पण आजूबाजूच्या लोकांनी अजिबात लक्ष दिले नाही. तो नेहमीसारखीच गंमत करतोय, असे वाटून त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले.

लांडग्याने एक एक करत सर्व मेंढ्या खाल्ल्या. दीपक झाडावर बसून रडू लागला. पण आता काहीच उपयोग नव्हता. त्याला आपली चूक लक्षात आली. पण आता फार उशीर झाला होता.

---

प्रश्न-

1. दीपकचा दिनक्रम काय होता?
2. दीपकने कोणती गंमत करायचं ठरवलं?
3. पहिल्या दिवशी दीपकने गंमत केल्यावर काय झाले?
4. तिसऱ्या दिवशी काय झाले?
5. दीपक जोरजोरात ओरडूनही शेतकरी मदतीला का आले नाहीत?